रजि. नं. ई.-११२

# साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ, (ट्रस्ट)

## नाशिकरोड - ४२२ १०१.

## ता. जि. नासिक (महाराष्ट्र)



स्थापना दि. २७ नोव्हेंबर १९६१

# घटना

# -: पार्श्वभूमी :-

नासिकरोड देवळाली विभागात विद्यार्थ्यांना आदर्श शिक्षण देवून नमुनेदार अशा शाळा चालवाव्यांत व शिक्षण क्षेत्रांत हा विभाग पुढारलेला ठरावा अशी अनेक दिवसाची तीव्र ईच्छा आमची होती. आमचे पैकी श्री. भा. वि. जोशी, श्री. शि. के. पांडे व श्री. रा. रा. कानवडे हे सरकारी मान्यता पावलेले ट्रेंड शिक्षक आहेत. गेले ७ - ८ वर्ष हे शिक्षण क्षेत्रांत शिक्षक म्हणून कार्य करीत आहेत आणि स्वतंत्र भारतातील भावी पिढीवर ज्या जबाबदाऱ्या आहेत त्या पेलण्यासाठी त्यांना सर्वदृष्टीने आदर्श बनविण्याचे प्रथम कार्य शाळांमधूनच होते आणि हा मूळ पाया आहे ही दृष्टी डोळ्यापुढे ठेऊन त्यांच्या काही स्तुत्य कल्पना होत्या परंतु शिक्षकाची नोकरी करून या कल्पना मूर्त स्वरूपांत आणता येत नाहीत, कारण शाळा चालविणाऱ्या चालक संस्थांचा दृष्टीकोन भिन्न असतो, आणि अशा अडचणीमुळे ध्येयवादी असूनही त्यांची परिणीती वाट चुकलेल्या सारखी होत गेली. आमचे पैकी श्री. इ. का. अत्तार हे ही एक ध्येयवादी सामाजिक कार्यकर्ते आहेत. आता पावेतो काही शैक्षणिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध आला व त्यांचाही शाळा चालविण्याचा दृष्टिकोन आदर्श आहे व अशाप्रकारे आम्हा सर्वांचे या क्षेत्रातील विचार दृष्टीकोन एक ठरले त्यामुळे आम्ही एकत्र येवून ही संस्था स्थापन करीत आहोत. शैक्षणिक संस्था ह्या धंदेवाईक संस्था होवू नये अशी ठाम भूमिका घेऊनच ह्या संस्थेची मुहुर्त - मेढ आम्ही करीत आहोत.

दुय्यम शाळा चालविणे आजच्या काळात आर्थिक दृष्या न पेलणारे आहे याची जाणीव असूनही आम्ही हे धाडस करीत आहोत. कारण केवळ पैशाचे कारण पुढे करून देशासंबंधी आमच्या कर्तव्यापासून आम्ही च्यूतहोवू शकत नाही. आम्हास असा विश्वास आहे की निस्पृहता, चोख व्यवहार आणि आदर्श ध्येयवाद दृष्टिपुढेअसल्यांस या विभागांतील सुज्ञ नागरीक उदार आश्रय देतात.

श्री. जोशी, श्री. पांडे व श्री. कानवडे हे आज इतरत्र शिक्षक म्हणून नोकरीस आहेत. ही संस्था काढल्यामुळे त्यांना नोकरीस मुकावे लागले. या नव्या संस्थेस स्थैर्य प्राप्त होई पावेतो अर्धपोटी रहावे लागेल हे उघड आहे परंतु ध्येयपूर्तीची जीज्ञासा त्या पलिकडची आहे. अर्धपोटी राहूनही ध्येयाप्रत पोहोचण्याची आमची इच्छा आहे आणि त्यासाठी स्वतंत्र संस्था असणे जरूर आहे.

संस्थेच्या सुरूवातीस प्राथमिक खर्चाकरीता आम्ही प्रत्येकी रु. ५००/- पांचशे देवून एकूण रू. २०००/- दोन हजाराचे भांडवलावर ही संस्था सुरू करीत आहोत. संस्था चालविण्यांस ही रक्कम अगदीच अपुरी आहे परंतु देणग्या, वर्गण्या व अन्य सनदशीर मार्गानी पैसा उभा करण्याचे आमचे प्रयत्न चालू आहेत. आमच्या या प्रयत्नात श्री. एकनाथ यशवंत फडोळ, श्री. विठ्ठल भागुजी अरिंगळे, श्री. डॉ. दत्तात्रय तुकाराम दिघे यांनी आत्मियतेने सहकार्य केले, वेळोवेळी सल्ला दिला त्यांचे आम्ही या संस्थेचे संस्थापक या नात्याने ऋणीआहोत.

ही संस्था कोणाचीही खाजगी मालमत्ता अगर मिरासदारी होवू नवे म्हणून ही पब्लिक ट्रस्ट ॲक्ट खाली रजिष्टर्ड करीत आहोत. या संस्थेचे विश्वस्त म्हणुन एक मंडळ काम पाहील, मात्र सर्व मिळकत, मालमत्ता ही संस्थेच्या पूर्ण मालकीची म्हणजे पर्यायाने जनतेच्या मालकीची राहील.

आज ता. २७ माहे नोव्हेंबर सन १९६१ सोमवार या दिवशी म. ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीच्या शुभ दिनी म. फुले व पुज्य साने गुरूजी यांच्या स्मृतीला अभिवादन करून या दोन्ही महाराष्ट्र संतांची उच्च शिकवण त्यांचा संदेश प्रत्यक्षांत उतरविण्याची पवित्र प्रतिज्ञा करून आम्ही "साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिकरोड" या संस्थेची स्थापना करीत आहोत.

साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिकरोड, जि. नाशिक

## -: घटना :-

**संस्थेचे नांव :** संस्थेचे नांव "साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ,(ट्रस्ट) नासिकरोड" असे संबोधण्यात यावे.

**उद्येश :**

१) नासिकरोड देवळाली नगरपालिका विभागात पूर्व प्राथमिक, प्राथमिक दुय्यम व महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रत्यक्ष शाळा चालवून प्रसार करणे, सर्व प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना देवून सरकार मार्फत होणाऱ्या सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट परिक्षेस विद्यार्थी बसविणे, मुंबई व पुणे विद्यापीठ, इतर सरकारी, निमसरकारी, सरकारमान्य सार्वजनिक संस्था या द्वारे होणाऱ्या परिक्षांना विद्यार्थी बसविणे, स्कॉलरशिप परीक्षांना विद्यार्थी बसविणे, संस्थेने चालविलेल्या शाळांतून उर्त्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून सायन्स कमर्शिअल टेक्नीकल



ॲग्रिकल्चरल लॉ व मेडिकल आणि औद्योगिक शिक्षण या करिता प्रवेश मिळवून देणे, प्रवेश राखून ठेवणे, प्राथमिक व दुय्यम शिक्षकांचे व शिक्षिकांचे ट्रेनिंग क्लासेस चालविणे, ट्रेनिंग कॉलेज चालविणे व अशा प्रकारे सर्व स्त्री पुरूषांना जाती धर्मयांचे बंधन न ठेवता शिक्षण देणे.

२) विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक व देशांचे आधारस्तंभ बनविण्यास आवश्यक असलेले सायन्स औद्योगिक ज्ञान संशोधन इत्यादी शिक्षण देण्याची, शालेय अभ्यासक्रमानुसार शिक्षण देण्यासाठी, विद्यार्थ्यांची नीतीमत्ता, नैतिकबल प्रामाणिकपणा, कष्टाळू वृत्ती यांची वाढ करण्यासाठी योग्य असे अध्यापक, इन्स्ट्रक्टर्स यांची संस्थेमार्फत चालविलेल्या शाळांतून नेमणुक करणे.

३) विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जोपासना करून त्यांना सशक्त, सतशिल, स्वाभिमानी असे स्वतंत्र नागरिक बनविणे.

४) वसतिगृहे (Boarding Houses) वसतिगृहांसह शाळा (Residential Institution) स्थापन करणे, चालविण्यास घेणे, चालविणे व त्यातुन विद्यार्थी घेणे ठेवणे त्यांना आवश्यक ती फी आकारणे.

५) संस्थेच्या मदतीकरिता देणग्या, अनुदाने, भेटी यांचा स्वीकार करणे व त्यांचा विनीयोग शिक्षण कार्यात करणे.

६) संस्थेचे विश्वस्थ मंडळ ठरवितील त्या प्रमाणे संस्थेकरिता कर्ज उभारणे, कर्ज घेणे, त्यातुन खर्च भागविणे, इमारत व इमारती बांधणे व त्यांचा उपयोग फक्त शिक्षण कार्यात करणे .

७) संस्थेमार्फत चालविलेल्या शाळांतून विद्यार्थ्यांकडून फी वसूल करणे व त्या फी च्या पैशाचा विनियोग शाळा सुव्यवस्थित चालविण्याकडे करणे. शिष्यवृत्या मिळविणे त्या विद्यार्थ्यांना देणे.

८) शिक्षकांना नियमानुसार वेतन देणे, त्यांचा योग्य तो मान राखणे, शिक्षक, विश्वस्थ व संस्था यांचे संबंध कुटुंबातील घटकांप्रमाणे जिव्हाळ्याचे प्रस्थापित करणे व त्यांच्या विव्दत्तेचा आदर करणे, जेणे करून त्यांना आपल्या कार्यात आत्मियता ऊत्पन्न होऊन प्रेम आणि सहकार्यांच्या भावनेने त्यांना काम करता येईल.

९) विद्यार्थ्यांना भावी आयुष्यांत मानाने जीवन जगता यावे. स्वतःच्या पायावर उभे राहून आदर्श नागरिक होऊन स्वाभिमानाने जगता यावे असे शिक्षण देण्यांत यावे.

१०) विद्यार्थ्यांमध्ये खिलाडूवृत्ती निर्माण करून शाळांच्या कक्षेत येणाऱ्या निरनिराळ्या खेळांमध्ये त्यांना तरबेज करणे व खेळांत प्रतिपक्षाकडे खेळाडू म्हणून बघण्याचा दृष्टिकोन निर्माण करणे.

११) विद्यार्थ्यांमध्ये शिस्त बाणविणे, कायदा व सुव्यवस्था यांचे पालन करण्याची शिकवण देणे व कायदा आणि नियम यातुन मिळालेला अंतीम निर्णय पाळणे हे शिक्षण देणे.

## शाळा व इतर मिळकती :

सर्व प्रकारची स्थावर व जंगम मिळकत, फंड, पैसा हा साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळ ट्रस्टच्या नावांवर राहील व त्यावर संपुर्ण मालकी मंडळाची राहील. सर्व मिळकतीची खरेदी विक्री, करारनामे, भाडे पट्टी हे मंडळाच्या नावाने मंडळाचे मॅनेजिंग ट्रस्टी व विश्वस्त मंडळ अधिकार देतील ते करतील.

## विश्वस्थांची कामे व अधिकार :

विश्वस्थांची कामे व अधिकार खालील प्रमाणे राहतील.

१) संस्थेमार्फत चालणाऱ्या शाळाकरीता नियम पोटनियम व कानून तयार करणे व ते संस्थेच्या उद्देशपुर्ती करिता त्यांची अंमलबजावणी करणे. सरकारने व शिक्षण खात्याने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व करवून घेणे.

२) मंडळाकरीता निधी उभारणे, सरकारी, निमसरकारी अनुदाने (ग्रँड्स) मिळविणे घेणे. देणग्या स्विकारणे. मंडळाचे कार्य वाढविणे, कार्याची विभागणी करणे. ट्रस्ट करिता पैसा खर्च करणे, ट्रस्ट करीता पैसा आणि मिळकती मिळविणे व घेणे, निरनिराळे करमणूकीचे सांस्कृतिक नाटके सिनेमा वगैरे सारखे कार्यक्रम त्यातून मंडळाकरीता मंडळाच्या शाळाकरीता मदत म्हणून पैसा उभा करणे.

३) विश्वस्थांना आवश्यक वाटल्यास मंडळाकरिता कर्ज उभारणे, फंड जमविणे, मोठ्या आर्थिक अगर मिळकतीच्या स्वरूपाच्या देणग्या मिळविणे व देणगीदाराच्या नांवाने शाळा चालविणे.

४) वर्गण्या, भेटी, देणग्या, कर्ज इतर शैक्षणिक संस्थांना देणे व त्या प्रकारच्या संस्था कडून स्विकारणे. त्या बाबतच्या अटी नियम वेळेनुसार ठरविणे.



५) गरिब व होतकरू प्रामाणिक विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे. मंडळाच्या विश्वासू व होतकरू कर्मचाऱ्यांना मंडळातून कर्ज अगर आर्थिक मदत देणे.

६) मंडळाकरीता जमीन जागा सरकारकडून, सरकार मार्फत ॲक्वायर करणे, भाड्याने घेणे, इमारत बांधणे, इमारत अगर इमारती भाड्याने घेणे, कराराने घेणे, करारनामे करणे, विक्री करणे, खरेदी करणे, मंडळाच्या इमारती सांभाळणे, त्यांची रिपेअर करणे.

७) मंडळाच्या मिळकती हक्क हित संबंध वाढविणे, विकणे, सांभाळणे, कार्यक्षम करणे, मोबदला करणे, लिज करणे, गहाण करणे, विकणे, दुसरे खाती बदलणे व इतर आवश्यक ते व्यवहार मिळकती व हक्क संबंधी करणे.

८) मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा शिक्षकांचा मेहनताचा, मानधंन वेतन ठरविणे व त्यांना बोनस देणे.

९) यदाकदाचित मंडळाच्या व मंडळाने चालविलेल्या संस्थाच्या कर्मचाऱ्यांस अपघास झाल्यास अपघाताच्या काळांत त्यांच्या उदरनिर्वाहास आर्थिक सहाय्य करणे, अपघातात त्यांस अपंगत्व आल्यास व त्यामुळे तो नोकरीवर रूजु होवू शकत नसल्यास त्यास पेंशन अगर तत्सम आर्थिक सहाय्य मंजूर करणे व आदा करणे.

१०) नियमानुसार मंडळाचे व मंडळाच्या संस्थेचे कर्मचारी शिक्षक सेवा निवृत्त झाल्यास त्यास पेंशन ठरविणे व देणे अगर प्रॉव्हिडंड फंड देणे.

११) मंडळाच्या सेवा निवृत्त अगर अकाली मृत्यु आलेल्या कर्मचाऱ्यांवर अवलंबून असलेल्या कुटुंबातील वारसास पेंशन, ग्रॅच्युइटी, प्रॉव्हिडंड फंड यापैकी एक आर्थिक मदत देणे.

१२) मंडळ चालवित असलेल्या शाळेतील कर्मचाऱ्यास कर्ज देणे.

१३) मंडळाकरीता व मंडळाने चालविलेल्या संस्थांकरिता अधिकारी कर्मचारी शिक्षक कर्मचारी वर्ग, एजन्ट नेमणे, नोकरीवर ठेवणे, विनावेतन तात्पुर्ते कायम प्रोबेशनवर पगारी ठेवणे व त्यांना विश्वस्त मंडळ ठरवितील ते अधिकार देणे

१४) मंडळाच्या व मंडळाने चालविलेल्या संस्थेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास बढती देणे, बदली करणे, नोकरीतून मुक्त करणे डिसचार्ज करणे, बडतर्फ (डिसमिस) करणे, सस्पेंड करणे, शिक्षा करणे, अशा वेळी प्रचलित सरकारी नियमांचा व संस्थेच्या नियमांचा विचार करणे व त्या नियमांच्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेणे.

१५) मंडळाच्या व मंडळाने चालविलेल्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांस कायम करणे, त्यांना प्रॉव्हिडंड फंड योजना लागू करणे, विमा योजना लागू करणे, रजा मंजूर करणे, कमी करणे, वाढवून देणे.

१६) मंडळाचा पैसा सरकारमान्य सिक्युरिटीज, शेड्युल्ड बँक, सरकारी कर्ज, रोखे, नॅशनल सेव्हींग्ज, स्मॉल सेव्हिंग, बक्षिस रोखे, फर्म, शैक्षणिक संस्था असोसिएशन कंपन्या या मध्ये गुंतविणे अगर स्थावर मिळकती खरेदी घेणे, शेअर्स जाईंट स्टॉक कंपन्यांचे डिबेंचर्स घेऊन गुंतविणे.

१७) नवी विश्वस्थांची (Trustees) नियुक्ती करणे.

१८) ट्रस्टी को. ऑप. (Co. opt) करणे.

१९) मंडळास व मंडळाच्या संस्थास सल्ला देण्यांस कार्यात मदत करण्यांस सल्लागार बोर्ड अगर सल्लागार मंडळ, सल्लागार मंडळे नियुक्त करणे. या सल्लागार मंडळाने ट्रस्टने सोपविलेले विषय व सर्वसाधारण धोरण यावर विचार करावा व मंडळास सल्ला द्यावा. मात्र विश्वस्त, अधिकारी यांनी सल्लागार मंडळाच्या सूचना, निर्णय संपुर्णपणे अगर त्यातला काही भाग मान्य करण्याचे ट्रस्टिच्या अधिकार कक्षेत राहील.

२०) सामान्यपणे मंडळाच्या वाढी करीता व सुरळीत कार्यक्षम कार्यपध्दती करिता आवश्यक ते प्रयत्न करावेत. मंडळाने चालविलेल्या संस्था वाढवाव्यांत. त्यावर देखरेख करावी. मंडळाचे उद्येश अंमलात आणावेत व प्रत्येक विश्वस्थाने मंडळाची कामे अधिकार व कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडावे.

## विश्वस्त मंडळ :- (Board of Trustees)

१) (अ) विश्वस्थ मंडळ ९ सदस्यापेक्षा जास्त नाही व ५ पेक्षा कमी नाही असे राहील. विश्वस्त मंडळ तहहयांत राहील. मात्र राजीनामा दिल्यास किंवा अपंगत्व, नादारी अगर गैरवर्तणूकीमुळे मंडळाने काढून टाकल्यास विश्वस्त मंडळात बदल होईल.

(ब) ट्रस्टीपैकी कोणी मयत झाल्यास, राजीनामा दिल्यास, काढून टाकल्यास रिकाम्या झालेल्या जागी उर्वरित विश्वस्थांनी नव्या ट्रस्टीची नियुक्ती करावी.

(क) ट्रस्टी को. ऑप. (co - opt) करता येतील,मात्र त्यामुळे एकुण ट्रस्टींची संख्या एका वेळी ९ पेक्षा जास्त होवु नये. को. ऑप. (co.-opt) केलेल्या ट्रस्टीस इतर ट्रस्टी प्रमाणेच सर्व अधिकार राहतील.



२) खालील सदस्य विश्वस्त मंडळाचे प्रथम विश्वस्थ राहतील (First Trustees of Trust) त्यांना सर्वांना किंवा त्यापैकी कोणाला बहुमताने विश्वस्थ मंडळातून काढता येणार नाही. मात्र या घटनेतील कलम १२ (विश्वस्थांची अपात्रता) हा सर्वांना लागू आहे. त्या कलमांतील कोणतेही कृत्य घडल्यामुळे दोषी ठरल्यास त्यास काढण्यास विश्वस्थ मंडळाला अधिकार राहील.

**१) श्री. सय्यद इब्राहीम कादरभाई अत्तार**
**२) श्री. भालचंद्र विश्वनाथ जोशी.**
**३) श्री. शिवप्रसाद केशरीलाल पांडे**
**४) श्री. राधाकृष्ण रामचंद्र कानवडे**
**५) श्री. विठ्ठल भागुजी अरिंगळे**
**६) श्री. एकनाथ यशवंत फडोळ**

## अ) पदाधिकारी :

मंडळाचे कामकाज पाहण्याकरीता खालील पदाधिकारी विश्वस्थां मधुन निवडता येतील.

१) मॅनेजिंग ट्रस्टी  २) सेक्रेटरी  ३) खजिनदार

## ब) पदाधिकाऱ्यांची कामे व अधिकार :-

## १) मॅनेजिंग ट्रस्टी :-

१) मंडळाच्या सभा सेक्रेटरीमार्फत बोलावणे व त्या चालविणे, सेक्रेटरीने सभा न बोलविल्यास स्वत: सभा बोलाविणे व चालविणे.
२) मंडळामार्फत चालविलेल्या संस्थांवर देखरेख करणे.
३) मंडळाच्या उद्धेश पूर्तीसाठी प्रयत्न करणे.
४) मंडळासाठी देणग्या, कर्ज भेटी स्विकारणे. अशा स्विकारलेल्या देणग्या, भेटी, कर्ज यास मंडळाची मान्यता देणे.
५) कायदेशीर बाबीकरीता सेक्रेटरी मार्फत अथवा स्वत: कार्यवाही करणे इ.
६) घटनात्मक पेचप्रसंग, मंडळांतर्गत मतभेद झाल्यास बहुमताने मंडळाचा कारभार सुरळित होण्याचे दृष्टीने स्वत:कडे अधिकार घेवुन कार्यवाही करणे.

७) वरील सर्व कृती घडतांना मंडळाची मान्यता असणे जरूरीचे आहे.

## २) सेक्रेटरी :-

१) मंडळाचा दैनंदिन कारभार पाहणे, पत्रव्यवहार करणे कायदेशीर पूर्तता करणे.

२) मंडळाच्या सर्व सभा मॅनेजिंग ट्रस्टी यांच्या संमतीने बोलाविणे, सभांच्या नोंदी ठेवणे, सभेला सर्व माहिती देणे, सभेच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे, मंडळाची प्रगती व विकासासाठी पत्रव्यवहार करणे इत्यादि.

३) मंडळाचे सर्व प्रकारचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, मंडळाच्या सर्व शाखाचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवले जातील, याची दक्षता घेण्यासाठी वेळोवेळी सर्व शाखांना भेटी देणे, माहिती घेणे व त्याची कार्यवाही करणे.

४) मंडळाच्या स्थावर इस्टेटीची व्यवस्थित नोंद ठेवणे, त्याची माहिती संबंधित शासकीय कार्यालयास वेळोवेळी कळविणे.

५) वर नमुद केलेल्या कामाव्यतिरिक्त घटनात्मक बाबींचा कागदोपत्री अथवा कार्यालयीन माहिती अगर कार्यवाही करण्याचा अधिकार राहील.

६) मंडळातील कोणत्याही कर्मचाऱ्याच्या बाबतीत तक्रारी आल्यास त्याची प्राथमिक चौकशी करून त्याचा अहवाल मंडळाच्या सभेपुढे ठेवणे. त्यावर मंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे इत्यादी.

## ३) खजिनदार :-

१) मंडळाचे सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार करणे.

२) मंडळाच्या दैनंदिन आर्थिक व्यवहाराचे हिशोब ठेवणे, मंडळाकडे आलेल्या पैशांचा बँकेत भरणा करणे, बँकेतून स्वत:च्या व मॅनेजिंग ट्रस्टींच्या सहीने पैसे काढणे.

३) मंडळच्या वेळोवेळी होणाऱ्या सभेवर त्या सभेपर्यंत झालेल्या जमाखर्चाची माहिती देणे, जमाखर्चास मंजूरी घेणे.

४) मंडळाच्या वार्षिक सभेवर वार्षिक जमाखर्च ठेवणे. तो मंजुर करून घेणे. जमाखर्चाचे नियमाप्रमाणे ऑडिट करून घेणे. मंडळाचे जमाखर्च योग्य त्या कार्यालयाकडे मुदतीत पाठविणे.



५) मंडळाच्या सर्व शाखांच्या जमाखर्चावर देखरेख ठेवून त्यांचे ऑडिट शासकीय नियमानुसार वेळोवेळी व्यवस्थित होतील व योग्य त्या कार्यालयाकडे मुदतीत पाठविले जातील हे पाहणे.

६) मंडळाच्या शाखांच्या जमाखर्चाची वेळोवेळी पडताळणी करणे, त्यावर योग्य ती देखरेख करून कार्यवाही करणे.

७) बँकेचे व्यवहार करतांना खजिनदाराची सही आवश्यक आहे. मॅनेजिंग ट्रस्टी गैरहजर असल्यास सेक्रेटरीच्या सहीने व्यवहार करावा.

निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची मुदत निवड झाल्यापासून दोन वर्षासाठी राहील.

## विश्वस्त वेतन :-

१) मंडळाकरीता कोणतेही काम केल्या बद्दल काहीही वेतन घेण्याचा विश्वस्थांना अधिकार नाही. मात्र मंडळा करिता काम करीत असतांना होणारा खर्च हा विश्वस्थास घेण्याचा अधिकार राहील आणि असा खर्च विश्वस्थ मंडळाने मंजूर करावा. तसेच एखाद्या ट्रस्टीची सर्व वेळ सेवा ट्रस्टचे मंडळाच्या कामाकरिता आवश्यक आहे असे मंडळास वाटल्यास त्याच्या ऊदरनिर्वाहाकरीता आवश्यक ती रक्कम मानधन म्हणून वेळोवेळी मंडळाने आवश्यक व योग्य वाटल्यास ठरवावी व त्याप्रमाणे द्यावी.

२) मंडळाने चालविलेल्या संस्थेत ट्रस्टींपैकी कोणी बिनपगारी, स्टायपेंडरी, पगारी एखादी नोकरी करीत असल्यास तो मंडळाचा विश्वस्त राहण्यांस अपात्र ठरणार नाही. मात्र संस्थेने अगर मंडळाने कर्मचाऱ्यांकरीता केलेले व सरकारने केलेले सर्व नियम अशा विस्वस्थांसही बंधनकारक राहतील. त्या नियमानुसार मिळणारे फायदे तोटे, सिनिऑरिटी, क्वालिफिकेशन या व्यतिरिक्त ट्रस्टि म्हणून कोणत्याही खास सवलती त्यास मिळणार नाहीत.

## निर्णय पध्दती :-

मंडळाच्या व मंडळाने चालविलेले संस्थेच्या कामकाजाचे व्यवस्थेत आणि काही वाद निर्माण झाल्यास अशा सर्व प्रश्नांचे निर्णय बहुमताने घेतले जातील. सभा संबंधीचे नियम बंधनकारक मानले जातील.

## आर्थिक व्यवहार :-

मंडळाचा सर्व पैसा सरकारमान्य बँकेत मंडळाच्या नावाने खाते उघडून ठेवावा. मॅनेजिंग ट्रस्टि व मंडळाचा खजिनदार या दोघांच्या सह्यांनी पैसा वेळोवेळी काढण्यात यावा. मंडळाने चालविलेल्या इतर संस्थांच्या नावाने येणारे चेक, ड्राफ्ट्स, मनिऑर्डर्स, हुंड्या, बिल्स, पार्सलस् इत्यादी बाबी बँकेत भरण्याचा ते वटविण्याचा मंडळाच्या खाती जमा करण्यांचा पावत्या देण्याचा मंडळाला व मॅनेजिंग ट्रस्टीला अधिकार आहे.

## ऑफिस रेकॉर्ड - हिशेबाचे वर्ष :-

१) मंडळाचे ऑफीस व रेकॉर्ड ट्रस्टी ठरवितील त्या ठिकाणी राहील. मंडळाचे व संस्थांचे रेकॉर्ड हिशेब पत्रव्यवहार कारकूनाकडून करून घ्यावा. त्यावर सेक्रेटरी ह्यांनी देखरेख ठेवावी व हिशेब मंडळ ठरविल त्या प्रमाणे वेळोवेळी मंडळाच्या मिटींगवर ठेवावा व जमा खर्चास मंडळाची मंजुरी घ्यावी. मंडळाचे आर्थिक हिशेबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च अखेर राहील.

२) विश्वस्थ मंडळाचे सर्व विषय निर्णय हे ठराव रूपाने होतील. हे निर्णय ठराव मिनिट बुकांत लिहीलेले असतील. त्या करीता मिनिट बुक ठेवण्यात येईल.

## मंडळाची सभा व कोरम :-

१) विश्वस्थ मंडळाची सभा किमान ३ महिन्यांतून एक व आवश्यक वाटल्यांस जरूरी प्रमाणे वेळोवेळी होतील. सर्व साधारण सभांची नोटीस ३ दिवस अगोदर व खास सभेची नोटीस १ दिवस अगोदर दिली जाईल. या सभा सेक्रेटरी बोलावतील. २/३ सभासद हजर असल्यास कोरम पूर्ण समजण्यांत येईल. कोरम अभावी तहकुब झालेली सभा एक तासापेक्षा कमी नाही व एक दिवसापेक्षा जास्त नाही अशा अंतराने घेण्यात येईल.

२) मंडळाचे सर्व विषय, निर्णय हे ठराव रूपाने होतील. हे निर्णय व ठराव मिनिट बुकांत लिहीले जातील, त्या करीता मिनिट बुक ठेवण्यांत येईल. मिनिट बुकांत फक्त ठराव व निर्णय यांचीच नोंद होऊन ठरावा वरील चर्चेची नोंद होणार नाही.



## विश्वस्थांची अपात्रता :-

कोणत्याही ट्रस्टीने त्यास या घटने अन्वये मिळालेल्या अधिकारा व्यतिरिक्त अगर अधिकाराचा गैर उपभोग, गैरवापर केल्यास अथवा संस्थेच्या आर्थिक व्यवहारात गोंधळ करणे, पैशाची अफरातफर करणे, निष्काळजीपणामुळे संस्थेस नुकसान पोहोचणे, विश्वस्थ मंडळाच्या मिटींगला सतत ४ वेळा लागोपाठ गैरहजर राहणे. मंडळाच्या व मंडळाने चालविलेल्या संस्थेच्या मालमत्तेचा पैशाचा खाजगी कामासाठी वापर करणे. मंडळाच्या कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन करणे त्यांची मानहानी करणे, त्यांच्या कामात व्यत्यय आणणे, त्यांच्यात बेदिली निर्माण करणे, त्यांच्या कर्तव्यापासून त्यांना परावृत्त करणे. मंडळास अगर संस्थेस नुकासान पोहोचेल अशा बाबतीत कर्मचाऱ्यांशी संगनमत करणे. अशा व इतर स्वरूपाचे गैरवर्तन करून मंडळास व संस्थेस आर्थिक नुकसान पोहोचेल, संस्थेस कमीपणा येईल. समाजात नागरिकांत विद्यार्थ्यांत संस्थेसंबधी गैर प्रचार होईल अशा कृती विश्वस्थांस विश्वस्थ म्हणून राहाण्यास अपात्र ठरविण्याऱ्या राहतील. मात्र अशा बाबींची विश्वस्थ मंडळ पुर्ण चौकशी करून खात्री पटल्यास सभेमध्ये ठराव करून ज्या व्यक्ती विरूध्द तक्रार असेल त्यास विश्वस्थ मंडळातून काढून टाकतील. मंडळाचे वा संस्थेचे काही आर्थिक नुकसान झालेले असल्यास तेही भरपाई करून घेण्यात येईल. ही रक्कम मंडळ ठरवील व त्या कामी आवश्यक वाटल्यास न्यायलयाचीही मदत घेण्यात येईल.

## घटनेत बदल :-

सरकार नगरपालिका यांच्या प्रचलित वा पुढे होणाऱ्या कायद्यानुसार मंडळाच्या घटनेत बदल करण्याची जरूरी वाटल्यास अगर मंडळाच्या प्रत्यक्ष कामकाजांत घटनेत काही अपूर्तता वाटल्यास घटनेत बदल करणेचा ट्रस्टींना अधिकार राहील. असा बदल करतांना सर्व विश्वस्थ मंडळाच्या सदस्यांचे शक्य तो एकमत व्हावे. सर्वबदल मे. चॅरिटी कमिशनर अगर मे. अ. चॅरिटी कमिशनर यांच्या मंजुरी नंतरच अंतीम समजण्यात येईल.

## जंगम मिळकत :-

मंडळाजवळ आज मितीस खालील प्रमाणे मिळकत आहे. ही मिळकत साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पूर्ण मालकिची झाली आहे व या मिळकतीचा ट्रस्ट करण्यात येत आहे.

| नांव | संख्या | अंदाजे किंमत. |
|---|---|---|
| १) लाकडी खुर्च्या | २ | ३०=०० |
| १) लाकडी टेबल | १ | ४०=०० |
| १) लाकडी कपाट | १ | ८०=०० |
| १) लाकडी फळे | ३ | ४५=०० |
| १) शालेय पुस्तके | ३० | ७५=०० |
| | एकुण ३७ | रू. २७०=०० |

TRUE COPY

सह्या :-

सेक्रेटरी
साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ
नासिकरोड

सेक्रेटरी
साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ
नाशिकरोड